# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. ०७१२-२५६७०२८
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र.481/शि.वि./२०१५
दि.16/०९/२०१५

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथमिक/माध्यमिक शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :-** ॲक्वाक्राप्ट प्रोजेक्टस प्रा. लि., मुंबई मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनाकरीता जागेची निश्चिती करण्याबाबत.

**संदर्भ :-** कार्यकारी अभियंता, जलप्रदाय विभाग , म.न.पा., नागपूर यांचे पत्र क्र. ज.प्र. /१०७१/का.अ. /१५ दि. १०.०९.२०१५

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, नागपूर महानगरपालिकेतर्फे नागपूर शहरातील मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना व नागरीकांना शुध्द पेय जल उपलब्ध करून देण्याकरीता ॲक्वाक्राप्ट प्रोजेक्टस प्रा. लि., मुंबई तर्फे विशेष योजना राबवित आहे. या योजनेमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांना विनामुल्य शुध्द पिण्याचे पाणी व स्वच्छतागृह उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच शाळा बंद झाल्यावर नागरीकांना रू. १/- प्रतिलीटर शुध्द पाणी व रू. १/- प्रतिव्यक्ती दरवेळी उपलब्ध करून देण्याचे ठरविण्यात आले आहे.

हि योजना कार्यान्वीत करण्याकरीता जागा, पाणी व विद्युत जोडणी महानगरपालिकेतर्फे उपलब्ध करून देण्याची मागणी ॲक्वाक्राप्ट प्रोजेक्टस प्रा. लि., मुंबई यांनी केली आहे. त्याकरीता आपल्या शाळेत सदर योजना राबविण्याकरीता उपयुक्त जागेची पाहणी करून त्याबाबतची माहिती आपल्या झोनच्या जलप्रदाय विभागाच्या कार्यालयात सादर करावी. व त्याची एक प्रत आपल्या झोनचे शाळा निरीक्षक यांचेकडे त्वरीत जमा करावे. तसेच शाळा किरायाच्या इमारतीमध्ये भरत असेल तर सदर योजना राबविण्याकरीता जागा उपलब्ध करून देण्याबाबत घरमालकाचे सहमतीपत्र सोबत संलग्न करावे.

शिक्षणाधिकारी,
महानगरपालिका, नागपूर

pc;2/reshma /Tembhurne sir/letterT